THE SEAL OF THE JOINT-SUB-REGISTRAR CLASS-2 * A.M.A.L.N.E.R *
सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांची मुद्रा
सत्यमेव जयते
अमळनेर

अमल
४६४२१३-१४
२०१६

६) सदरहु मिळकतीवर इतर नातेवाईकांनी काही त्यांचा हक्क अधिकार सांगितल्यास त्याचे निवारण पदरखर्चाने जमिन मालक हे करतील व त्यांची कोणतीही तोशिष विकासक यांना लागु देणार नाही. तसेच मिळकतीसंबंधी सिमावाद झाल्यास तो वाद जमिन मालक यांनी पदरखर्चाने सोडवून देण्याचा आहे. तसेच सदर मिळकती संबंधी कोर्टात वाद झाल्यास त्याचे निवारण करुन घेण्याची जबाबदारी जमीन मालकाची आहे व राहील किंवा अतिक्रमण असल्यास ते अतिक्रमण हटवून देण्याची जबाबदारी जमिन मालक यांची आहे व राहील.

७) सदरहु मिळकत मार्केटेबल टायटल क्लिअर आहे व सदरचे मिळकतीची सरकारी मोजणी झालेली आहे व बिनशेती परवानगी, रस्ता, नकाशा मंजुर करण्यासाठी लागणारा खर्च एन.ए परवानगी घेण्यासाठी लागणारा खर्च स्कुटीनी फी, डेव्हलपमेंट चार्ज व सरकारी मोजणी यासाठी होणारा खर्च लिहुन घेणार यांनी सोसावयाचा आहे.

८) वरील मोबदला हा जमिन मालक यांना मान्य व कबुल आहे व त्यासंबधी काही जमिन मालक यांचे वालीवारस किंवा हक्कदार यांनी काही दावा केल्यास त्यांचे निवारण करण्याची जबाबदारी जमिन मालक यांची राहील. त्यासंबधी कोणतीही तोषीस विकासक यांना जमिन मालक लागु देणार नाहीत व सदरचा करारनामा जमिन मालक यांचे वाली वारसांना बंधनकारक आहे व राहील.

९) वरील करार हा विकासक यांना मान्य व कबुल आहे व त्यासंबधी काही विकासक यांचे वालीवारस किंवा हक्कदार यांनी काही दावा केल्यास त्यांचे निवारण करण्याची जबाबदारी विकासक यांची राहील. त्यासंबधी कोणतीही तोषीस जमिन मालक यांना विकासक लागु देणार नाहीत व सदरचा करारनामा विकासक यांचे वाली वारसांना बंधनकारक आहे व राहील.

१०) प्रस्तुतचे कराराने लिहुन घेणार यांना विकसीत करण्याकरीता देण्याचे कबुल केलेल्या मिळकत वर मंजुर करुन घेणार असलेलया बांधकाम आराखडयाप्रमाणे इमारतीचे बांधकाम विकासक यांस किंवा त्यांचे नॉमिनीजना करावयाचे असल्यास तसेच बांधकाम करण्याकरीता सदरहु मिळकतीचा खुला व निर्विवाद कब्जा बांधकाम प्रारंभ करतेवेळी विकासक यांना परवाना धारक म्हणून देण्याचा आहे व तसा विकासक यांनी निर्विवाद कब्जा परवाना धारक म्हणुन त्या वेळेस घेण्याचा आहे.

११) सदरचे मिळकतीचे कराराचे तारखेपासून २४ महिन्यात बांधकाम पूर्ण करावयाचे आहे,मुदतीत बांधकाम पूर्ण करणेची जबाबदारी लिहून घेणार विकासक यांची राहील. यदाकादाचीत बांधकाम करतांना काही एक अपघात अथवा शासकीय